

पुणे : भारत फोजमार्फत स्वच्छताविषयक प्रशिक्षण देण्यात आले.

# सफाई कर्मचाऱ्यांना भारत फोर्जमार्फत दिले स्वच्छताविषयक प्रशिक्षण

**पुणे, दि.८ (प्रतिनिधी) –** पुणे महापालिका माध्यमिक शाळांमधील शिपाई सेवक आणि हडपसर क्षेत्रीय कार्यालयातील सफाई कामगार यांचे भारत फोर्ज कंपनीमार्फत एकदिवसीय स्वच्छताविषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात ५२ शिपाई आणि ६ सफाई सेवक सहभागी झाले होते. भारत फोर्जच्या सीएसआर सेलच्या प्रमुख एचआर डॉ. लीना देशपांडे, समन्वयक चंद्रशेखर वाळके, अंजली यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सफाईसाठी साहित्याचा कशा प्रकारे परिणामकारकपणे वापर करता येईल, याविषयीची माहिती या प्रशिक्षणात देण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस माजी महापौर वैशाली बनकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी माजी नगरसेवक सुनील बनकर, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी मीनाक्षी राऊत आदी उपस्थित होते. भारत फोर्ज कंपनीने महात्मा फुले माध्यमिक विद्यालय हडपसर दत्तक घेतले आहे. कंपनीतर्फे विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



हडपसर : स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची टाकी व संगणक कक्ष उभारण्यात आला आहे. त्याची पाहणी करताना मान्यवर.

# भारत फोर्जचे कार्य कौतुकास्पद

**हडपसर –** सामाजिक दायित्व विभागामार्फत शाळा दत्तक प्रकल्पांतर्गत भारत फोर्ज कंपनीने पालिकेच्या शाळेला केलेली मदत ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत आमदार योगेश टिळेकर यांनी व्यक्त केले. भारत फोर्ज कंपनीने हडपसर गाडीतळ येथील महापालिकेची महात्मा फुले ही शाळा दत्तक घेतली आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची टाकी व संगणक कक्ष यांचे नूतनीकरण करण्यात आले आहे. यावेळी अतिरिक्त आयुक्त राजेंद्र जगताप, शिक्षणाधिकारी मिनाक्षी राऊत, भारत फोर्ज कंपनीच्या अधिकारी लीना देशपांडे, सुनील बनकर, वंदना कोद्रे, डॉ. शंतनु जगदाळे, डॉ. दादा कोद्रे, अर्चना बनसोडे, मदन वाव्हळ, चंद्रशेखर वाळके, अंजली यादव, अक्षता चंचे उपस्थित होते.